Publication: Punyanagari
Date: 29/2/2020
Page: 4
Column: 4

पुण्य नगरी

शनिवार, २९ फेब्रुवारी २०२० | मुंबई

# सेफ्टी प्लस स्वच्छाग्रह प्रशिक्षण कार्यक्रम

**मुंबई :** अदानी फाऊंडेशन, अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने (एईएमएल) मुंबई महापालिकेच्या मदतीने २,२६९ शाळांमध्ये 'सेफ्टी प्लस स्वच्छाग्रह' हा तीन दिवसीय प्रेरक प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेतला आहे. शिक्षक व मुख्याध्यापक स्वच्छाग्रह प्रेरकांची भूमिका घेऊन विद्यार्थ्यांमध्ये 'स्वच्छतेची संस्कृती निर्माण' करण्यासाठी व मुलांसाठी सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी या प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करतील. 'सेफ्टी प्लस स्वच्छाग्रह' या कार्यक्रमादरम्यान सुरक्षितता व स्वच्छाग्रह या विषयावर अनेकविध प्रशिक्षण सत्रे घेतली जाणार आहेत. यामध्ये कोणत्याही प्रकारचे विद्युत अपघात, नैसर्गिक व मानवनिर्मित आपदा, आग यांपासून सुरक्षितता, वाहतूक सुरक्षितता, पेयजलाची सुरक्षितता आणि अन्य आपत्कालीन परिस्थितींपासून सुरक्षितता यांचा समावेश होतो. स्वच्छाग्रह अनेक शालेय मुलांपर्यंत पोहोचण्यास सज्ज आहे ही अभिमानाची तसेच भाग्याची बाब आहे. मुले देशाचे भावी नागरिक आहेत. त्यांच्यात परिवर्तनाची क्षमता तर आहेच, शिवाय ते स्वतःच्या उदाहरणातून नेतृत्व करू शकतात आणि लोकांचे वर्तन बदलण्यासाठी त्यांच्यावर प्रभाव टाकू शकतात, असे अदानी फाऊंडेशनच्या विश्वस्त शिलिन आर. अदानी यांनी सांगितले.